भिवंडी वाहतूक उपविभाग हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७२ /२०२६ दि २७/०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि.२८/०३/२०२६ रोजी व दि. २९/०३/२०२६ रोजी पर्यंत भिवंडी निजामपुरा महानगरपालिका तर्फे **'एस.टी डेपो ते बागे फिरदोस मस्जिद पर्यंत ४० मीटर लांब पेव्हर ब्लॉक लावण्याचे काम'** करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) नारपोली माणकोली, रांजनोली कडुन कल्याणनाका मार्गे वंजारपट्टीनाका ब्रिजकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भिवंडी एस.टी. डेपो** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची जड, अवजड वाहने कल्याणनाका येथुन उजवे वळण घेवुन रांजनोली नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच इतर मध्यम व हलकी वाहने बागे फिरदोस कडुन एस.टी. स्टॅण्ड कडे येणाऱ्या वाहिनीवर विरूध्द दिशेने बागे फिरदोसकडे जावुन इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) नदिनाका व चाविद्रा रोड कडुन नारपोली माणकोली रांजनोली कडे जाणाऱ्या जड अवजड वाहनानां **वंजारपट्टी नाका व वंजारपट्टी ब्रीज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची जड, अवजड वाहने वंजारपट्टी नाका व वंजारपट्टी ब्रीज येथुन चाविंद्रा रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना **दि. २८/०३/२०२६ व दि.२९/०३/२०२६ रोजी रात्रौ २२:०० वा. ते सकाळी ०६:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील व सदर कामातील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.